# हसमुख सेवेचे व्रत

प्रकाशित:

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

**© पुनरारंभ**

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# हसमुख सेवेचे व्रत

मानवी आयुष्यात अशा काही व्यक्ती येतात की, त्यांचा जवळून अथवा दुरान्वये कसाही संबंध आला तरी त्या कायम स्मरणात राहतात. मला जसे समजू लागले तसे माझ्या बालपणातील स्मरणात राहिलेल्ल्या काही अशाच अविस्मरणीय व्यक्ती, त्यांचा तो वेश त्यांच्या सवयी, लकबी इ.अजूनही जशाच्या तशाच ताज्या आहेत.

माझा जन्म व बालपण नगर जिह्यात कोपरगांव तालुक्यात साकरवाडी येथे गेले. आमचे कडे तत्कालीन दि गोदावरी शुगर मिल्स लि.साकरवाडी च्या वसाहतीमध्ये रोज सकाळी पाव बटर बिस्कीट विकणारा शंकर पाव वाला यायचा. जवळच वारी गावात त्याची बेकरी असल्यामुळे रोज ताजा व चवदार माल त्याचे कडे असे. आम्हाला जाग यायची ती त्याच्या खणखणीत व दमदार “ पाऽऽव बटर बिस्कीऽऽऽट” या आरोळीनेच. त्याच्या आरोळीमध्ये एवढा दम होता व आरोळी देण्याची लकब अशी वैशिष्टय पूर्ण होती की, तो जर दोन चाळी सोडून मागील चाळीत कोठेतरी कोप–यात असला तरी, पुढच्या चाळीतील लोकांना अगदी जवळ असल्याचा भास व्हायचा. वयाची पन्नाशी गाठलेला, सड सडीत बांधा, पूर्ण सहा फूट उंची, पांढरा पूर्ण बाहीचा शर्ट, गुडघ्याच्या खाली येईल असे नेसलेले दोन टांगी पांढरे धोतर, पायात जाड चपला, डोक्यावर टोपली, टोपलीत निरनिराळया प्रकारची बिकिस्टे व क्रीमरोल च्या पिशव्या नीट व्यवस्थित ठेवलेल्या, खांद्याला शबनम बॅग त्यात पाव बटरच्या लाद्या रचलेल्या. अंगात शर्टखाली बंडी. बंडीला छातीजवळ वर दोन्ही बाजूला पोटापर्यंत पर्यंतचे तिरपे खिसे व खाली दोन सरळ खिसे. माल देण्या घेण्या साठी कीती जरी वाकले तरी त्यातील एक पैसा ही खाली पडत नसे. त्याची पैसे देवाण घेवाण करण्याची व बंडीत पैसे ठेवण्याची लकब अजब न्यारी होती, जी शब्दात वर्णन करणे अशक्य आहे.

शंकर पाववाला वारी गाव व साकरवाडी येथे नावाजलेला गृहस्थ होता. स्वभावाने तो जेवढा कठोर तेवढाच मृदु. आपल्या व्यवसायाशी अतिशय प्रामाणिक. कधी कोणास उधार माल देत नसे. लहान मुलांवर त्याचे फार प्रेम होते. त्याला लहान मुले फार आवडायची. एखादे मुल पाव बटर घेण्याच्या हट्टास पेटले व पालकांची विकत घेण्याची इच्छा नसली तर पैशाची अपेक्षा न करता “घे बाळा रडू नको” म्हणत त्या मुलास टोपलीतून पाहिजे ती वस्तू हाताने उचलण्यास सांगायचा व बालहट्ट पूर्ण करायचा. बिस्किट मिळाल्यावर बालकाच्या चेह–यावरील समाधान पाहून त्याचा चेहरा उजळलेला दिसायचा.

याच समान वसाहतीला दुध पुरवठा करणारे कंपनीचे समवयस्क दुधवाले कामगार, नामे हनुमंत चैाधरी, मामु रबारी व त्याचा मोठा भाउ, देवा. पहाटे पाच वाजताच रेल्वे लाईनच्या पलिकडे भरतवाडीहून खांद्यावर कावड घेउन, कावडीस दोन्ही बाजूला चाळीस चाळीस लिटरच्या दोन पितळी कॅन लावून रोज सकाळ संध्याकाळ साधारण २.५ किलोमिटर अंतर चालत यायचे व चाळी चाळीतून “ दूऽऽध ” अशी आरोळी देत दूध वाटप करावयाचे. आरोळी ऐकताच आई बरोबर घरात मिळेल ती वाटी, फुलपात्र अथवा कप घेउन आम्ही दूध घ्यावयास धावायचो. दुधवाले काका आमच्या भांडयात पण साधारण अर्धा कप दुध तोटी वाटे सोडायचे. त्या अर्धाकप दुधाचे आम्हास फार अप्रुप वाटायचे. एक वेळेस आईने दिलेले दुध आम्ही नाकारत असू पण ते अर्धा कप दुध आनंदाने पित असू. या तिघांचे व्यक्तिमत्व त्यांच्या अंगमेहनतीला शोभेल असे आडदांड, धष्टपुष्ट, उंच व कणखर होते. मामु रबारी व त्याचा मोठा भाउ, देवा दोघे मुळचे काठेवाडचे असल्यामुळे त्यांचा पेहराव आकर्षक होता. पोटापर्यंत उंचीचा, शिलाईने डिझाइन केलेला, बिनबाही व लहानशा पट्टीची कॉलरचा पांढरा बंडीवजा बुशशर्ट, घोटयापर्यंत नेसलेले पांढरे धोतर, डोक्यात मुंडाश्या प्रमाणे पीळ घालून घातलेला फेटा, कानात भिकबाळी, मनगटात चांदीचे कडे.

सर्व चाळी फिरून माल विकणे व दूध घालण्यास त्यांना साधारण सकाळचे आठ वाजायचे. घरी जाण्याच्या आधी आमच्या घरासारखे वसाहतीत त्यांची काही ठराविक घरे होती. शंकर पाववाला दारात येताच डोक्यावरील पाटी खाली उतरवित व गळयातील पिशवी दाराला अडकवित हक्काने आईला आवाज द्यायचा “ताई मी आलोय एक कप चहा दे.” याच वेळेस हनुमंत चैाधरी, मामु रबारी व त्याचा मोठा भाउ, देवा पण आपले दुध वाटपाचे काम संपवून यायचे. चहा येईपर्यंत दुधवाले डेअरीतून मिळालेले दुध व वाटपानंतर त्याबदल्यात गोळा झालेली कुपने याचा हिशेब करित तर शंकर मिळालेल्या पैशाचा हिशेब लावित बसे. या सामुहिक चहापानामध्ये दुधवाल्यांचा वाटप करून उरलेले आतपाव, पावशेर दुध तर शंकरचा पाव, खारीचा सहभाग असायचा. चहाचा घोट घेत घेत आपसात थोडीशी चेष्टा मस्करी व सुख दुःखाच्या गोष्टी करित चहापानाचा कार्यक्रम व्हायचा. चहापान झाल्यावर सर्वजण पुन्हा प्रसन्न चेह–याने, हसत मुखे नउच्या दरम्यान आपापल्या घराकडे मार्गस्थ व्हायचे.

उतार वयातील थकलेला चेहरा, कपाळावरचा घाम व अंगमेहनतीचे कष्ट करित असतांना देखिल संपर्कात येणा–या प्रत्येक लहान अथवा मोठया व्यक्तींशी, कोठलाही त्रागा अथवा राग राग न करता हसतमुखे सेवा देणे, हा त्यांचा गुण वाखाणन्याजोगा होता. अजूनही जेव्हा जेव्हा मी साकरवाडीला जातो तेव्हा मला त्यांची प्रकर्शाने आठवण येते व लोटला तो काळ, सरले ते दिवस व

राहिल्या त्या आठवणी म्हणत त्यांचे स्मरण होते . आयुष्यात जणू त्यांनी हस मुख सेवेचे व्रतच स्विकारले होते .